21 MAY 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दै. 'पुढारी'चे संस्थापक संपादक पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव यांच्या स्मृतिदिनानिमित्त शाहू स्मारक भवन येथे आयोजित व्याख्यानमालेत बोलताना जागतिक कीर्तीचे अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर. यावेळी उपस्थित प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव व डॉ. रत्नाकर पंडित. (छाया : पप्पू अत्तार)

21 MAY 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आयात न करता स्व-ऊर्जा तंत्रज्ञान निर्मितीची गरज

## 'पुढारी'कार ग. गो. जाधव व्याख्यानमालेत अणुशास्त्रज्ञ डॉ. काकोडकर यांचे प्रतिपादन

- भारताचा ह्यूमन डेव्हलपमेंट इंडेक्स सुधारण्याची गरज
- आयात हा पर्याय असता कामा नये
- गॅस हायड्रेड ऊर्जा भारताला ३००-४०० वर्षे पुरू शकेल!
- स्वच्छ ऊर्जा निर्मितीची गरज

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढला पाहिजे. त्याकरिता वाढीव ऊर्जेची गरज आहे. सौर आणि अणुऊर्जेमुळे त्या गरजा पूर्ण होतील, त्यासाठी दुसऱ्या देशाकडून तंत्रज्ञान आयात न करता स्वत:चे तंत्रज्ञान विकसित केले पाहिजे, ती क्षमता भारतात आहे, असे प्रतिपादन जागतिक कीर्तीचे अणुशास्त्रज्ञ, पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांनी रविवारी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दै. 'पुढारी'चे संस्थापक संपादक पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव यांच्या स्मृतिदिनानिमित्त शाहू स्मारक भवन येथे आयोजित व्याख्यानमालेत 'शाश्वत ऊर्जा सुरक्षा; आव्हाने व पर्याय' या विषयावर ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव प्रमुख उपस्थित होते.

डॉ. काकोडकर म्हणाले, ऊर्जा ही फार जवळची आणि महत्त्वाची गोष्ट आहे. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात प्रगती ज्या पद्धतीने होत आहे, ते पाहता आपल्या देशाला ऊर्जेची अधिक गरज आहे. पुढारलेल्या देशांतही ऊर्जेची गरज आहे. मात्र, त्याकरिता ते नवीन संयंत्रे बसवतील, असे नाही. जुन्याच संयंत्राचा वापर करून ते ऊर्जेची गरज पूर्ण करतील; पण भारतात वाढलेली ऊर्जेची गरज भागवायची असेल, तर नवीन संयंत्रे बसवावी लागतील.

### ह्यूमन डेव्हलपमेंट इंडेक्स सुधारण्याची गरज

पुढारलेल्या देशांप्रमाणेच भारतातील जीवनमान उंचावयाचे असेल, तर सध्या वापरात असलेल्या ऊर्जेच्या चौपट ते पाचपट ऊर्जेचा वापर वाढणे गरजेचे आहे, असे सांगत डॉ. काकोडकर म्हणाले, भारताचा 'ह्यूमन डेव्हलपमेंट इंडेक्स' सुधारलेला नाही. पुढारलेल्या देशात मात्र त्याचा स्तर वरचा आहे. या देशात आणखी ऊर्जा उपलब्ध करून दिली, तरी त्या देशांच्या 'ह्यूमन डेव्हलपमेंट इंडेक्स'मध्ये फरक पडणार नाही. मात्र, भारतासारख्या देशात अशी ऊर्जा वाढवली, तर लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्याचा फायदा होणार आहे. २४०० किलोग्रॅमपर्यंत सरासरी ऊर्जेचा वापर होतो, तो वाढला पाहिजे. त्याकरिता चार बिलियन टनपर्यंत ऊर्जा निर्मिती वाढायला पाहिजे. या स्तरापर्यंत ऊर्जा निर्मिती करायची असेल, तर ऊर्जा निर्मितीवर भर दिला पाहिजे.

### आयात हाच पर्याय असू नये

डॉ. काकोडकर म्हणाले, कोळसा, तेल, गॅस हेच सध्याचे ऊर्जा स्रोत आहेत, त्याचा वापर जास्त आहे आणि निर्मिती कमी आहे. म्हणून आपण परदेशातून तेल, कोळसा आयात करतो. ज्या प्रमाणात आपण परदेशातून ही साधनसामुग्री आयात करतो, त्याचे प्रमाण आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील त्याची किंमत पाहता ती सतत वाढत जाणारी आहे. यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम होतो, हे मोठे आव्हान आहे. आयातीत सर्वात मोठी ऊर्जा क्षेत्रासाठीची साधनसामुग्री आयात होते. हे प्रमाण पाच ते सात पटीने वाढले, तर त्याचे परिणाम अर्थव्यवस्थेवर सातत्याने होत राहतील. याकरिता आपण पर्याय शोधले पाहिजेत. परदेशातून आयात करणे हा आपल्यासमोरील पर्याय असू नये, असेही त्यांनी सांगितले.

पान ७ ▶

### डॉ. ग. गो. जाधव यांचा वारसा समर्थपणे पुढे जात आहे

*स्वातंत्र्यपूर्व काळातील एक अख्खी पिढी झपाटलेल्या माणसांची होती, त्यांनी अथक प्रयत्नांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. त्यानंतर सामाजिक, शैक्षणिक आदी सुधारणा नेटाने पुढे नेल्या, त्या परंपरेत डॉ. ग. गो. जाधव यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल, असे सांगत डॉ. काकोडकर म्हणाले, पत्रकारिता हे एक साधन मानून डॉ. ग. गो. जाधव यांनी विविध क्षेत्रात योगदान दिले. त्यांनी ज्याप्रकारे सामाजिक काम केले, त्यांचा हा वारसा 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव समर्थपणे पुढे चालवत असल्याचे गौरवोद्गारही डॉ. काकोडकर यांनी काढले. प्रथितयश दैनिक म्हणून 'पुढारी'ची ओळख आहेच; पण त्याचे समाजकार्यही सर्वश्रुत आहे. सर्वोच्च रणभूमी असलेल्या सियाचीन येथे 'पुढारी'च्या पुढाकाराने सैनिकांसाठी हॉस्पिटल बांधले, गुजरातमध्ये भूज येथेही अशाच प्रकारचे हॉस्पिटल बांधले. हा समाजकार्याचा मोठा वारसा असल्याचेही त्यांनी सांगितले.*

21 MAY 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आयात न करता स्व-ऊर्जा तंत्रज्ञान निर्मितीची गरज

(पान १ वरून)

**गॅस हायड्रेड ऊर्जा तीन-चारशे वर्षे पुरेल**

जगात आता गॅस हायड्रेडवर चर्चा सुरू आहे; पण त्याचा वापर अजून सुरू झालेला नाही, असे सांगत डॉ. काकोडकर म्हणाले, समुद्राच्या तळाशी अनेक साठे आहेत, तिथे मिथेन वायू घनरूपात आहे. तो वर आणला तर त्याचे बाष्पीभवन होते. त्यासाठी तो सुरक्षित वर आणण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाला आहे. भारत अशा गॅस हायड्रेडबाबत समृद्ध आहे. त्यातून निर्माण होणारी ऊर्जा तीनशे-चारशे वर्षांची देशाची वाढीव गरज पूर्ण करू शकेल.त्याकरिता यावर लक्ष केंद्रित केले, तर येत्या काही वर्षात आपण ते साध्य करू शकतो. ज्या ठिकाणी कोळसा आहे, त्या ठिकाणीही मिथेन गॅस मिळतो. अशा ठिकाणी विहिरी खणून हा गॅस बाहेर काढला पाहिजे. हा गॅस बाहेर काढू शकतो का, त्याचे जेवढे उत्पादन होईल, तेवढा त्याचा वापर होईल का, यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. याकरिता जेवढे लक्ष द्यायला पाहिजे होते, तेवढे दिले गेले नाही, असेही त्यांनी सांगितले.

**बायोगॅस : बिनधुराच्या चुली निर्माण केल्या पाहिजेत**

शेणाच्या गोवऱ्या, सरपण आदी बायोमासद्वारे होणाऱ्या ऊर्जेचा २० टक्के वापर केला जातो, असे सांगत डॉ. काकोडकर म्हणाले, या ऊर्जेचा परिणाम होतो. धूर निर्माण होतो, त्यातून प्रदूषण होते. हे प्रदूषणच होणार नाही, अशा चुली निर्माण केल्या पाहिजेत. गोवऱ्या पूर्णपणे जळतात, त्यातून द्रवरूप इंधन, गॅस निर्मिती केली, तर त्याचा अधिक उपयोग होईल. आता तंत्रज्ञान विकसित झाले आहे, पिकाच्याही शिल्लक राहणाऱ्या घटकांपासून बायोगॅस निर्माण करण्यात येत आहे. यामुळे बायोगॅसचे प्रमाण वाढणार आहे. हायड्रो कार्बन, तेल आदींच्या वापराने जेवढे इंधन निर्माण होईल, तेवढे इंधन बायोमासमधून निर्माण करू शकतो, चार-पाच वर्षांत अशी परिस्थिती निर्माण होईल, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

निसर्गातील सर्व ऊर्जा आहे तशी वापरता येत नाही, असे सांगत डॉ. काकोडकर म्हणाले, विजेच्या उपयोगाने सर्व गरजा भागवू शकणार नाहीत. मात्र, वाहने विजेवर चालायला लागली की तेलाची आवश्यकता कमी होईल. वीज आणि गॅस यांच्या वापराचे प्रमाण वाढेल, तर कोळसा आणि तेल याचा वापर कमी होईल. त्यातून ऊर्जेचे नवीन संसाधन शक्य आहे. कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन होत नाही, अशा ऊर्जेचे उत्पादन केले पाहिजे. कोळशापासून वेगवेगळ्या देशांत गॅस निर्मिती केली जाते. भारतातील कोळशात राखेचे प्रमाण अधिक असल्याने ते शक्य झाले नाही; पण त्यावर सर्वांनी काम केले पाहिजे, हे चित्र बदलले पाहिजे.

**बॅटरी डेव्हलपमेंट**

बॅटरी डेव्हलपमेंट ही जगभर चालू असलेली प्रक्रिया आहे, असे सांगत डॉ. काकोडकर म्हणाले, बॅटरी तीस वर्षे टिकेल, एकूण विजेच्या, ऊर्जेच्या कमीत कमी खर्च येईल, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. सौरऊर्जेची निर्मिती 'डीसी' असते. इन्व्हर्टर लावून त्यावर 'एसी'ची उपकरणे वापरता येतात, यामुळे अशी व्यवस्था पुढे आली पाहिजे. तंत्रज्ञान वाढवण्याचे काम केले पाहिजे, त्याला चालना देण्याचे काम केले पाहिजे. सौरऊर्जेच्या माध्यमातून वीज, वाफेची निर्मिती होऊ शकते, रासायनिक प्रक्रिया करून पाण्याचे विभाजन करून हायड्रोजन तयार करता येईल, याद्दष्टीने बीएआरसी, ओएनजीसी आदींचे काम सुरू आहे. सोलर थर्मलच्या माध्यमातूनही आयआयटीचेही काम सुरू आहे. देशात अणुऊर्जा तंत्रज्ञानाचा विकास होत आहे. ७०० मेगावॅटच्या १० अणुभट्ट्या निर्माण करण्याची परवानगी देण्यात आली आहे. यामुळे अणुऊर्जा क्षमतेचा वेग वाढेल. सुमारे ४८ ते ४९ हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती यामुळे साध्य होणार आहे.

**स्वच्छ ऊर्जा निर्माण होण्याची आवश्यकता**

वातावरणातील बदलाचा सामना करणारी, स्वच्छ ऊर्जा निर्माण झाली पाहिजे, त्याकरिता स्वतःचे आराखडे केले पाहिजेत. सातत्याने संशोधन सुरू राहिले पाहिजे. तंत्रज्ञानातून पुढे आलेले काम सतत चालू राहिले पाहिजे. पुढारलेल्या देशांत तंत्रज्ञान आयात करत नाहीत असे नाही, तिथेही तंत्रज्ञान आयात होते. मात्र, आयात केलेल्या तंत्रज्ञानापेक्षा अधिक तंत्रज्ञान ते निर्यात करत असतात. भारतात स्वतःच्या बळाचा वापर करून संशोधन वाढवले पाहिजे. आपले तंत्रज्ञान अनेकदा परदेशातील 'व्हेंडर'वर अवलंबून असते. ते जे सांगतात, ते कधीच खरे नसते; पण त्यावरच आपण अवलंबून राहतो आणि ते खरेदीही करत असतो. पण, देशाची प्रगती साधायची असेल, तर ऊर्जा क्षेत्रात भारताने स्वतःचे तंत्रज्ञान विकसित केले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, क्लिष्ट असा विषय डॉ. काकोडकर यांनी सहज, सोप्या भाषेत मांडला. लोकांचे राहणीमान सुधारायचे असेल, तर महत्त्वाचे उद्दिष्ट ऊर्जा आहे. मानवी विकास निर्देशांकात १८८ देशांच्या यादीत इराक, इराण, चीन, ब्राझील अगदी श्रीलंकेसारखाही देश आपल्या वर आहेत. भारताचा १३१ वा क्रमांक आहे. भारतासाठी हे चित्र चांगले नाही. ऊर्जेची प्रगती शाश्वत असावी त्याकरिता काय करावे, याबाबत स्वतःचे तंत्रज्ञान विकसित करावे, असे डॉ. काकोडकर यांनी सांगितले. यामुळे अनेक प्रश्न सुटतील, असा विश्वास यावेळी शिर्के यांनी व्यक्त केला.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. डॉ. शिर्के यांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह आणि शिवाजी विद्यापीठाने प्रकाशित केलेले पुस्तक देऊन डॉ. काकोडकर यांचा सन्मान करण्यात आला. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. शिवराम भोजे, उपकुलसचिव जी. एस. राठोड, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश जाधव, अधीक्षक आर. आय. शेख यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

## डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन देशातील पहिलेच

*'पुढारी'चे संस्थापक संपादक डॉ. कै. ग. गो. जाधव यांनी शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेसाठी सर्वोच्च योगदान दिले, त्याच विद्यापीठात त्यांच्या नावे पत्रकारितेचे अध्यासन सुरू झाले. पत्रकारितेतील हे देशातील पहिले अध्यासन असल्याचे अध्यासन प्रमुख डॉ.रत्नाकर पंडित यांनी सांगितले. संशोधन कार्य, माध्यम प्रतिनिधींना मार्गदर्शनाचे काम या अध्यासनाच्या वतीने करण्यात येणार असल्याचेही डॉ. पंडित यांनी सांगितले.*

## विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

*डॉ. काकोडकर हे जागतिक दर्जाचे अणुशास्त्रज्ञ असल्याने त्यांच्या व्याख्यानासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. संशोधक, उद्योजक, अभ्यासक विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. डॉ. काकोडकर यांना विशेष सुरक्षा व्यवस्था असल्याने शाहू स्मारक भवन येथेही पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. उपस्थितांचे दै. 'पुढारी' परिवार व शिवाजी विद्यापीठाच्या वतीने स्वागत करण्यात आले.*

21 MAY 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऊर्जा क्षेत्रात भारत स्वावलंबी आवश्यक : काकोडकर

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापूर येथे रविवारी ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी आपले विचार व्यक्त केले.

**कोल्हापूर** : भारतातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रचंड ऊर्जेची गरज लागणार असून, याबाबतीत परदेशांवर अवलंबून राहण्यापेक्षा आपण स्वावलंबी होणे आवश्यक आहे, असे मत अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी व्यक्त केले. येथील शाहू स्मारक भवनमध्ये रविवारी ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. यावेळी 'पुढारी'चे मुख्य संपादक प्रतापसिंह जाधव यांची मुख्य उपस्थिती होती.

भारत आणि विदेशी ऊर्जावापराचा आढावा घेत डॉ. काकोडकर म्हणाले, भारताचा विकास निर्देशांक अजूनही कमी आहे. अशा परिस्थितीत भारतीयांचे जीवनमान उंचावण्यासाठी ऊर्जा अपरिहार्य ठरते. म्हणूनच वातावरणातील बदलाचा सामना करणारी, स्वच्छ ऊर्जा निर्माण झाली पाहिजे; परंतु त्यासाठीचे आराखडे हे स्वदेशी असण्याची गरज आहे. पुढारलेल्या देशात तंत्रज्ञान आयात करतात; मात्र त्यापेक्षा अधिक तंत्रज्ञान ते निर्यात करतात. भारतात स्वत:च्या बळाचा वापर करुन संशोधन वाढविले पाहिजे. परदेशी सहयोगातून ऊर्जानिर्मिती करताना त्यांनी सांगितलेल्या सर्वच गोष्टी वस्तुस्थितिदर्शक नसतात; परंतु त्याच माहितीवर आधारित राहून आपण तसे तंत्रज्ञान खरेदीही करतो. याचा पुनर्विचार आवश्यक आहे. अशा पद्धतीचे स्वतंत्रज्ञान विकसित करण्याची भारताची क्षमता आहे.

डॉ. काकोडकर म्हणाले, कोळसा, तेल, गॅस हेच सध्याचे ऊर्जास्रोत आहेत. त्यांचा वापर जास्त आहे आणि निर्मिती कमी आहे; म्हणून आपण परदेशातून तेल, कोळसा आयात करतो. ज्या प्रमाणात आपण परदेशातून ही साधनसामग्री आयात करतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर या ऊर्जास्रोताचे दर पाहता त्याचे विपरीत परिणाम आपल्या अर्थव्यवस्थेवर होत असल्याचे दिसून येत आहे. समुद्राच्या तळाशी घन स्वरुपातील मिथेनचे अनेक साठे आहेत, तिथे मिथेन वायू घनरुपात आहे. तो वर आणला तर त्याचे बाष्पीभवन होते. त्यासाठी तो सुरक्षित वर आणण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर सुरु झाला आहे. भारत अशा गॅस हॅड्रेडबाबत समृद्ध आहे. त्यातून निर्माण होणारी ऊर्जा तीनशे-चारशे वर्षांची देशाची वाढीव गरज पूर्ण करु शकेल. डॉ. रत्नाकर पंडित यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. शिवराम भोजे, उपकुलसचिव जी. एस. राठोड, आदी उपस्थित होते.

# अणुशास्त्रज्ञ डॉ. काकोडकर व डॉ. प्रतापसिंह जाधव यांची चर्चा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नॅशनल अ‍ॅकॅडमी ऑफ सायन्सेस इंडियाचे प्रेसिडेंट, राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजी कमिशनचे चेअरमन जागतिक कीर्तीचे ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी रविवारी दै. 'पुढारी'च्या मुख्य कार्यालयास सदिच्छा भेट दिली. 'पुढारी'चे संस्थापक संपादक पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांनी अभिवादन केले. यानंतर त्यांनी मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली. याप्रसंगी उभयतांनी डॉ. ग. गो. जाधव यांच्या आठवणी जागवीत स्मृतींना उजाळा दिला.

डॉ. काकोडकर म्हणाले, काही दिवसांपूर्वी शिवाजी विद्यापीठात निवडक शेतकऱ्यांची बैठक घेऊन चर्चा करून अडचणी व मते जाणून घेतली. जिल्ह्यात साखर उत्पादन व गुऱ्हाळघरांची संख्या जास्त असली, तरी गूळ भेसळयुक्त व गुणवत्तापूर्ण नसल्याचे बोलले जाते. नैसर्गिक व भेसळविरहीत गूळ पावडरसह इतर उत्पादनांसंदर्भात कोल्हापूर गूळ संशोधन केंद्र व शिवाजी विद्यापीठाने एकत्रितपणे काम करून नवीन चळवळ उभी केल्यास शेतकऱ्यांना पर्याय उपलब्ध होऊन त्यांचे जीवनमान उंचावेल.

डॉ. प्रतापसिंह जाधव म्हणाले, महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासमवेत डॉ. ग. गो. जाधव यांनी चळवळीत काम केले. सामाजिक कार्यात त्यांचा हिरिरीने सहभाग होता. डॉ. ग. गो. जाधव यांनी दै. 'पुढारी'रूपी लावलेल्या रोपट्याचा वटवृक्ष झाला आहे. स्पर्धेच्या युगात चीनसारख्या देशाने वृत्तपत्र कागदावरील पुनर्प्रक्रिया बंद केली आहे. त्यामुळे कॅनडा, रशियातून कागद मागविण्याची वेळ आली आहे. दर महिन्याला वृत्तपत्र कागदाच्या किमतीत वाढ होत असून, खर्च दुप्पट झाला आहे. अशा परिस्थितीतही दै. 'पुढारी'चा स्वतंत्र वृत्तपत्र म्हणून दर्जा कायम असल्याचे त्यांनी सांगितले.



**कोल्हापूर : दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांच्याशी विविध विषयांवर चर्चा करताना ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर. शेजारी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, वरिष्ठ उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. (छाया : पप्पू अत्तार)**

## सियाचीनमध्ये रुग्णालय उभारल्याचे समाधान

*कारगिल युद्धावेळी हजारो जवान युद्धभूमीवर जखमी झाले. त्यांना वेळेत उपचार मिळत नसल्याचे मेजर जनरल शिवाजीराव पाटील यांच्याकडून समजले. तत्कालीन संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांच्यासमवेत चर्चा करून जवानांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी रुग्णालय उभारण्याचा मानस व्यक्त केला. त्यानुसार दै. 'पुढारी'ने सियाचीन येथे अडीच कोटी खर्चाचे सुसज्ज रुग्णालय उभारले. या रुग्णालयातून आतापर्यंत ४४ हजार जवान उपचार घेऊन बाहेर पडले आहेत. गेली १५ वर्षे दै. 'पुढारी' सर्व गोष्टी रुग्णालयास पुरवीत आहे. सियाचीनसारख्या अतिउच्च युद्धभूमीवर रुग्णालय उभारल्याचे समाधान इतर कोणत्याही गोष्टीतून मिळणार नाही, अशी कृतज्ञ भावना दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी व्यक्त केली.*

डॉ. जाधव म्हणाले, सर्वच राजकीय पक्ष, संस्था, संघटनांबरोबर संबंध चांगले आहेत. अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडून सोडवणूक केली आहे. ऊस आंदोलनात सहभागी होऊन दराची कोंडी फोडण्याचा प्रयत्न सातत्याने केला आहे. साखरेबरोबर इतर उत्पादने वाढविल्यास शेतकऱ्यांना याचा नक्कीच फायदा होईल. डॉ. जयंत नारळीकर, डॉ. वसंत गोवारीकर यांच्यासारखी बोटांवर मोजण्याएवढी मराठी शास्त्रज्ञांची नावे आहेत. परंतु, डॉ. काकोडकर यांचा अणुशास्त्रज्ञ म्हणून नावलौकिक पाहिल्यानंतर मराठी माणूस एवढ्या मोठ्या पदावर असल्याचा अभिमान वाटतो, असे गौरवोद्गार डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी काढले.

डॉ. काकोडकर म्हणाले, कोल्हापूर जिल्ह्यात ऊस क्षेत्र जास्त आहे. साखरेपेक्षा येथील गूळ खूप प्रसिद्ध असल्याने भाव जास्त आहे. 'आयसीटी' संस्थेला गूळ पावडर प्रकल्प सुरू करण्याबाबत सांगितले. परंतु, काही कारणास्तव ते लांबणीवर पडले. 'आयआयटी'ने वारणानगर येथे प्रकल्प उभारला आहे. तो सर्वांना पाहण्यासाठी खुला करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादनांना पर्याय मिळावा म्हणून प्रयत्न सुरू असल्याचे डॉ. काकोडकर यांनी सांगितले.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, वरिष्ठ उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. डॉ. रत्नाकर पंडित आदी उपस्थित होते.

2 1 MAY 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'पुढारी'कार डॉ. ग. गो. जाधव यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दै. 'पुढारी'चे संस्थापक-संपादक कै. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांच्या ३१ व्या स्मृतिदिनानिमित्त 'पुढारी भवन' येथील पुतळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. खासदार राजू शेट्टी, आमदार राजेश क्षीरसागर, आमदार विश्वजित कदम, माजी खासदार निवेदिता माने, निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. हरिष जगताप, शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत, ॲड. धनंजय पठाडे, महापालिकेचे शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता आर.एस.पाटील, निवृत्त उपअभियंता डी.जी.कल्याणकर, अनिल कदम, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष वसंतराव मुळीक, शिक्षक नेते दादासाहेब लाड, 'मेडा'चे कोल्हापूर क्षेत्रीय अधिकारी रवींद्र घोलप यांचा समावेश होता.

**अभिवादन कार्यक्रमास उपस्थित :** कोल्हापूर शहर महानगर वृत्तपत्र विक्रेता असोसिएशनचे अध्यक्ष रवी लाड, संघटक शंकरराव चेचर, कार्याध्यक्ष सुरेंद्र चौगुले, सचिव अमर जाधव, इंद्रजित पोवार, समीर कवठेकर, जिल्हा स्वाभिमानी वृत्तपत्र विक्रेता व एजंट संघाचे अध्यक्ष किरण व्हनगुत्ते, कार्याध्यक्ष परशुराम सावंत, श्रीपती शियेकर, सुरेश ब्रह्मपुरे, अंकुश परबे, सागर रुईकर, धनंजय शिराळकर,

शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे रमेश पोवार, सुरेश पाटील, अजय आयरेकर, कोजिमाशि'चे चेअरमन प्रा.एच.आर.पाटील, एस.एच. कोंडेकर, अशोक मानकर, जयवंत कुरडे, राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हा नेते कृष्णात कारंडे, संदीप मगदूम, राजू तौंदकर, हिंदुराव परीट, शरद केनवडे, मनपा प्राथमिक शिक्षक संघाचे शहराध्यक्ष मनोहर सरगर, उपाध्यक्ष दिलीप माने, संतोष बाबळे, कमलाकर काटे, संदीप सुतार, महानगरपालिका प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रमुख सुधाकर सावंत, शहराध्यक्ष संजय पाटील, वसंत आडके, संजय कडगावे, उमेश देसाई, बंटी सावंत आदी उपस्थित होते.

दरम्यान, दसरा चौक यैथील राजर्षी शाहू स्मारक भवनमध्ये झालेल्या अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या व्याख्यानास उपस्थितीत असलेल्या मान्यवरांची नावे अशी - कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीचे सभापती कृष्णात पाटील, सचिव मोहन सालपे, संचालक व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष भगवान काटे, ॲड. महादेव आडगुळे, माजी महापौर आर. के. पोवार, शाहूपुरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजय मोरे, कागलचे पोलिस निरीक्षक औदुंबर पाटील, लक्ष्मीपुरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक तानाजी सावंत,

श्री गुरुदत्त शुगर्स लि. टाकळीवाडीचे चेअरमन माधवराव घाटगे, कुंभी कासारी सह. साखर कारखान्याचे संस्थापक संचालक शंकरराव पाटील - शिंगणापूरकर, सुधाकर थोरात, कास्ट्राईब महासंघाचे महासचिव नामदेवराव कांबळे, महावीर महाविद्यालयाचे प्रा. अजितकुमार चौगुले, विवेकानंद कॉलेजचे प्रा. एस. आर. कदम, उद्योजक माधव पाटील, सुवर्णा पाटील, सुनील शिंदे, आर. बी. वाळवेकर, केमिकल इंजिनिअर जितेंद्र खोत, डॉ. विनायक दिवाण, प्रा. आर. जी. सोकवडे, शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य दिनेश जंगम, शिक्षकवृंद प्रशांत जाधव, सुरेश जाधव, सूरज जाधव, मिलिंद पाटील, एस. एस. तारे, शिक्षिका भाग्यश्री आळवेकर, इंडियन पोटॅश लि. (मुंबई) चे सयाजी पाटील, सुनील शिंदे, ज्येष्ठ नागरिक दशरथ पवार, निवृत्त मेजर जे. बी. नलावडे, आर्किटेक्ट मोहन वायचळ, संतोष माळी, अनिल माळी, विक्रमसिंह जाधव,

श्रीकांत शिंदे, सागर शिंदे, जयदीप पोवार, प्रकाश पाटील, अवधूत पाटील, सुशांत डफळे, चंद्रकांत चव्हाण, अशोकराव देशमुख, ऋषिकेश कदम, शुभम शिरहट्टी, मारुती जाधव, प्रकाश भवड, रवींद्र कबनुरकर, सतीश वडणगेकर, सौरभ कागवाडे, विलास कुंभार, सौरभ कणिरे, संजय खोत, अभिजित जनवाडे, व्ही. व्ही. तेंडुलकर, रंगनाथराव कुंभार, दिनेश पाटील, जितेंद्र पाटील, शिवप्रतिष्ठान पुणे, विजय पत्रावळे, मयूर मोरे, राहुल हजारे, विद्या साळुंखे, आराध्या साळुंखे, आकाराम साळुंखे, संदीप पाटील, श्रीरंग मंडले, सी. डी. कांबळे, आर. एम. कोकणे, यु. पी. बकरे, एस. डी. मोहिते, रवींद्र पाटील, प्रवीण मांडवकर, तानाजी पाटील, अरुण चौगुले, बापूसो चौगले, विनोद सडोलीकर, सुहास बारई, आशिष चौगले, किरण मस्कर, कुमार चव्हाण, सिराज मोडक, जयसिंग कांबळे, शंकर सावंत, प्रसाद कसबेकर, सौरभ कांबळे, सूरज आमते, अजिंक्य रमेश कारतेकर, अजित सासने, अरुण चिले, श्रीकांत पाटील, शिवाजी पाटील, सुभाष तांबेकर, प्रा. आर. के. ढवळे, के. बी. गडकरी, बी. एस. शिपुर्डे, अनिता जनवाडकर, के. एन माणगावे, जी.डी गवळी, एस.एस देवकर, दिलीप माने, ऋषिकेश झेंडे, सदानंद कुलकर्णी, रावसाहेब सुतार, निषद पोतदार, दर्शन भोपळे, आशिष आयरे, राहुल गडकर, त्रिरत्न कांबळे, संदीप वानखेडे, विलास धोंड, शशिकांत खोत, सुनील चौगुले, अमित पाटील, सूरज शिंदे, शुभम पवार, प्रवीण देशपांडे, मारुती पाटील, प्रशांत जाधव, सुहास घोडे, गणेश कुमठेकर, प्रवीण व्यंकटकर, प्रमोद पटनागरे, यश चौगुले, शिवराज पराळे, नागेश सोलकर, नितीन दळवी, विलास सूर्यवंशी, अजिंक्य थोरवडे, अमित पाटील, निखिल मगदूम.

2 1 MAY 2018 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांचे निकाल 'एमकेसीएल'च्या फेऱ्यात

## निकाल 'डाटा बदला'मुळे पेंडिंग : बीए, बीकॉम, बीएस्सीचे विद्यार्थी निकालापासून वंचित

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेडच्या (एमकेसीएल) चुकीचा फटका शिवाजी विद्यापीठातील सुमारे ४० हजार विद्यार्थ्यांना बसला आहे. प्रवेशापासून परीक्षेपर्यंत सतत चुका झाल्यामुळे शासनानेच 'एमकेसीएल'चे काम थांबवले आहे. शिवाजी विद्यापीठानेही टप्प्याटप्प्याने या निर्णयाची अंमलबजावणी केली. आता ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७ मध्ये परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल डाटा बदलामध्ये (डाटा मायग्रेशन) अडकले आहेत. प्रलंबित निकालामुळे विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासह नोकरीपासून वंचित रहावे लागत आहे.

सर्वच विद्यापीठांमधील प्रवेशापासून निकालापर्यंतचे सर्व ऑनलाईन प्रवेश व परीक्षा अर्ज भरण्याचे काम शासनाने 'एमकेसीएल'ला दिले होते. मात्र या संस्थेबाबत तक्रारी वाढल्याने शासनाने संस्थेला सर्वच विद्यापीठांमधील काम थांबविण्याचे आदेश दिले. परिणामी २०१५–१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या पहिल्या सत्रातील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे काम विद्यापीठाने आपल्या स्वतंत्र प्रणालीद्वारे केले. त्यानंतर 'कोअर इन्फोटेक' या संस्थेला परीक्षेचे काम दिले. जानेवारी २०१८ पासून बियाणी टेक्नॉलॉजीचे सॉफ्टवेअर विद्यापीठाच्या परीक्षेच्या कामात कार्यरत आहे. 'एमकेसीएल' कडून डाटा बदलाचे काम पूर्ण न झाल्याने निकाल देण्यात विद्यापीठाला अडचणींचा सामना करावा लागत आहे. पदवी तृतीय वर्षाचा निकाल हातात नसल्याने पदव्युत्तरसाठी प्रवेश घेता आला नाही. त्यामुळे एक वर्ष वाया गेल्याचे एका विद्यार्थ्याने सांगितले.

### पुढच्या आठवड्यात विद्यार्थ्यांना मिळणार निकाल

'एमकेसीएल'ने विद्यापीठ परीक्षांचे निकाल जुलै २०१७ ला विद्यापीठाकडे दिले आहेत. मात्र एसक्युएल प्रणालीकडून ओरॅकल प्रणालीकडे ट्रान्स्फर करण्यासाठी अडचणी येत आहेत. पुढच्या आठवड्यात हे काम पूर्ण करून सर्व विद्यार्थ्यांना निकाल देणार आहे.

**– महेश काकडे (परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक)**



### विद्यार्थ्यांसमोरील अडचणी

- ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७ चा निकाल मिळाला नसल्याने विद्यापीठ प्रशासन व विद्यार्थ्यांमध्ये वाद.
- पत्राद्वारे मिळालेले गुणपत्रक अधिकृत मानले जात नसल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान
- निकालाअभावी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षांपासून विद्यार्थी वंचित
- दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करता आला नाही. नोकरीलाही मुकावे लागले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAY 2018
सकाळ

# एमपीएड यंदा तरी सुरू होणार का?

कसबा बावडा, ता. २० : शिवाजी विद्यापीठ म्हणजे कोल्हापूर, सातारा व सांगली या तीन जिल्ह्यांच्या क्रीडा क्षेत्राची मातृसंस्था पण या विद्यापीठात शारीरिक शिक्षणातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सोय नाही. गेले अनेक वर्षे बंद असलोला हा अभ्यासक्रम या वर्षी तरी सुरू होणार का? असा प्रश्न क्रीडा क्षेत्रातून विचारला जात आहे.



शिवाजी विद्यापीठ क्षेत्रात चार बीपीएड महाविद्यालये आहेत. त्यापैकी एक बंद करण्याचा त्या प्रशासनाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे सध्या तीन महाविद्यालये सुरू आहेत. यामधील पदव्युत्तर अभ्यासक्रम फक्त मिरज येथील पद्मसिंह पाटील शारीरिक महाविद्यालयात सुरू होता. राज्य शासनाची परवानगी न घेतल्याने गेल्या वर्षापासून तोही अभ्यासक्रम बंद करण्यात आला आहे, तसेच यापूर्वी विद्यापीठात हा दोन वर्षांचा अभ्यासक्रम सुटीत घेतला जायचा. नोकरी करणाऱ्यांना हा अभ्यासक्रम उपयोगी होता. पण एनसीटीई, भोपाळ या संस्थेने देशातील अशा प्रकारचे शिक्षण व शारीरिक शिक्षणाचे अभ्यासक्रम बंद केले. त्यामुळे विद्यापीठातील हा अभ्यासक्रम १९९४ च्या दरम्यान बंद करावा लागला. गेल्या दोन वर्षापूर्वी कुलगुरूंनी समिती नेमली होती. या समितीने या अभ्यासक्रमाविषयी अहवाल दिला आहे. यामध्ये स्वयं:अर्थसहाय्य या तत्त्वावर हा अभ्याक्रम सुरू करावा अशीही शिफारस केली आहे, हा अहवाल कोणाच्या कपाटात पडला आहे याचा शोध घ्यावा लागेल.

## अभ्यासक्रम का हवा?

- पीएचडीसाठी प्रवेश घेताना बाहेरील विद्यापीठातील पदवी असल्यास केवळ दोन टक्केच जागा आहेत.
- पीएचडीसाठी विद्यार्थ्यांना इतर विद्यापीठांवर अवलंबून राहावे लागत आहे.
- पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कोर्सवर्क अपुरे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAY 2018
तरुण भारत

# कलानिकेतन महाविद्यालयाची अज्ञातांकडून तोडफोड

प्रतिनिधी
कोल्हापूर

संभाजीनगर येथील कलानिकेतन महाविद्यालयाच्या आवारातील झाडांचे संरक्षक कठडे, महाविद्यालयीन इमारतीच्या खिडकीच्या काचा, अध्यक्षांची केबीनची मध्यरात्री अज्ञातांनी तोडफोड केली. या प्रकरणी रविवारी संस्था अध्यक्ष जयसिंगराव मोरे यांनी जुना राजवाडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

जुना राजवाडा पोलिसांनी दिलेली माहिती अशी, संभाजीनगर येथे कलानिकेतन शिक्षण संस्था आहे. या संस्थेचे कार्यालय, कलानिकेतन महाविद्यालय कळंबा आयटीआयसमोर आहे. कलानिकेतन महाविद्यालयात मध्यरात्री अज्ञातांनी प्रवेश केला. महाविद्यालयाच्या इमारतीत वर्गखोल्यांना असलेल्या काचांची तोडफोड केली. संस्था अध्यक्षांच्या केबिनची तोडफोड केली. खुर्च्या, टेबलची मोडतोड केली. अध्यक्षांची खुर्ची पेटवून दिली. यात संस्थेचे १० हजार रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती संस्थाध्यक्ष जयसिंगराव मोरे यांनी दिली. जुना राजवाडा पोलीस ठाण्यात याप्रकरणी अज्ञातांवर गुन्हा नोंद झाला आहे.

**दहा हजारांचे नुकसान, जुना राजवाडा पोलिसांत नोंद**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 MAY 2018

लोकसत्ता

# सोलापूर विद्यापीठ नामांतरावर पडदा

## ३१ मे रोजी अहिल्यादेवी होळकर नामविस्तार

प्रतिनिधी, सोलापूर

**सोलापूर विद्यापीठाला** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे नाव देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यापाठोपाठ लगेचच येत्या ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ नामविस्तार सोहळ्याचे आयोजनही करण्यात आले. या विद्यापीठाला ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराजांचे नाव देण्याची वीरशैव शिवा संघटनेची मागणी आहे. त्यांची समजूत घालताना वीरशैव लिंगायत समाजाच्या अन्य विविध मागण्यांची पूर्तता करण्याचे आश्वासन सरकारने दिले आहे. त्यामुळे आता विद्यापीठाच्या नामविस्ताराच्या वादावर पडदा पडणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

आरक्षणाच्या मुद्द्यावर प्रचंड नाराज असलेल्या धनगर समाजाला दिलासा देण्याच्या राजकीय हेतूने सरकारने सोलापूर विद्यापीठाला अहिल्यादेवी होळकरांचे नाव देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. वास्तविक या विद्यापीठाला सोलापूरचे ग्रामदैवत सिद्धेश्वरांचे नाव देण्याची वीरशैव लिंगायत समाजाची मागणी आहे. मुळातच या विद्यापीठाला कोणाचे नाव द्यायचे, याबाबतचे स्वतंत्र असे तब्बल २० पेक्षा जास्त प्रस्ताव विद्यापीठाकडे आले होते. त्यामुळे या मुद्द्यावर कायदा व सुव्यवस्थेला बाधा येण्याची शक्यता गृहीत धरून विद्यापीठाने कोणाचेही नाव न देता पूर्वीचेच सोलापूर हेच नाव कायम ठेवण्याचा ठराव मंजूर करून शासनाकडे पाठविला होता. तर दुसरीकडे अहिल्यादेवी होळकरांच्या नावासाठी धनगर समाजाने तर सिद्धेश्वर महाराजांच्या नावासाठी वीरशैव लिंगायत समाजाने परस्पर विरोधात जनआंदोलन केले होते. त्यामुळे बिघडलेले स्थानिक सामाजिक वातावरण लक्षात घेता शासनाकडून योग्य तोडगा काढण्याची अपेक्षा होती. परंतु तसा सर्वमान्य तोडगा न काढताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परस्पर गतवर्षी नोव्हेंबर महिन्यात नागपूर येथे धनगर मेळाव्यात सोलापूर विद्यापीठाला अहिल्यादेवी होळकरांचे नाव देण्याची घोषणा केली होती. त्यामुळे लिंगायत समाजात प्रचंड नाराजी पसरली आणि राज्यभर आंदोलने झाली होती. त्याच सुमारास लिंगायत समाजातील काही मंडळींनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेऊन दाद मागितली असता हे प्रकरण आजतागायत प्रलंबित आहे. लिंगायत समाजाचेच असलेले पालकमंत्री विजय देशमुख यांचीही कोंडी झाली होती.

या पार्श्वभूमीवर अखेर मुंबईत शिक्षण व उच्च शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या दालनात झालेल्या बैठकीत सोलापूर विद्यापीठाला अहिल्यादेवी होळकरांचे नाव देण्याचा मार्ग मोकळा झाला. या बैठकीस वीरशैव शिवा संघटनेचे नेते प्रा. मनोहर धोंडे हे देखील उपस्थित होते. त्यांनी वीरशैव लिंगायत समाजाच्या विविध आठ मागण्या मान्य करून घेतल्यानंतर विद्यापीठ नामांतराच्या वादावर पडदा पडला. या बैठकीत ठरल्यानुसार सोलापूर रेल्वे स्थानकाला सिद्धेश्वर महाराजांचे तर बोरामणी विमानतळाला महात्मा बसवेश्वरांचे नाव देण्याची शिफारस केंद्राकडे केली जाणार आहे. याशिवाय मंगळवेढा येथे महात्मा बसवेश्वरांचे स्मारकाच्या उभारणीला गती दिली जाणार आहे.

21 MAY 2018

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॅम्पसमध्येही प्लास्टिकबंदी

## विद्यापीठांना यूजीसीच्या सूचना; जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर निर्णय

म. टा. प्रतिनिधी, पुणे



राज्यात सर्वत्र प्लास्टिकबंदी लागू करायला काही महिनेही उलटले नाहीत, तोच आता देशभरातील शिक्षणसंस्था आणि विद्यापीठांतही प्लास्टिकबंदी लागू होण्याची चिन्हे आहेत. जागतिक पर्यावरण दिनाच्या (५ जून) पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशातील विद्यापीठांना प्लास्टिकबंदीचे निर्देशच दिले असून, विद्यापीठांच्या कॅम्पसमध्ये आणि उच्चशिक्षण देणाऱ्या संस्थांच्या आवारात प्लास्टिकच्या बाटल्या, प्लास्टिक कप; एवढेच नव्हे तर प्लास्टिकचे डबे, स्ट्रॉ आणि बॅगचा देखील वापर केला जाऊ नये, अशा धर्तीच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

जागतिक पातळीवर दर वर्षी साजरा केल्या जाणाऱ्या जागतिक पर्यावरण दिनासाठी यंदाच्या वर्षी भारत हा यजमान देश असून, 'जगातून प्लास्टिक प्रदूषण संपवा' ही या वर्षीची विशेष थीम असणार आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेकडून हा दिवस साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार शिक्षणसंस्था देखील प्लास्टिकमुक्त कराव्यात, म्हणून हे पाऊल 'यूजीसी'कडून नुकतेच उचलण्यात आले आहे. दुसरीकडे, पर्यावरण मंत्रालयाकडून देशातील शाळांनाही आपल्या आवारात प्लास्टिकबंदी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

'शिक्षणसंस्थांतून बाटलीबंद पाणी, लंच रॅप-बॉक्स, कॉफी कप, थर्मोकोलच्या प्लेट अशा अनेक गोष्टींचा मोठ्या प्रमाणावर वापर केल्या जातो. त्यावर नियंत्रण ठेवल्यास प्लास्टिकचा वापर आपोआप नियंत्रित केला जाणे शक्य होईल. शिवाय, एकदाच वापरून फेकून देण्याच्या अशा पाण्याच्या प्लास्टिक बॉटल न वापरता पुन्हा-पुन्हा वापरता येतील अशा बाटल्या पिण्याच्या पाण्यासाठी वापरण्याविषयी विद्यार्थ्यांना सूचना द्या, प्लास्टिकबंदीबाबत विद्यार्थ्यांमध्ये अधिकाधिक जागृती करा,' अशा विशेष सूचनाही 'यूजीसी'ने विविध विद्यापीठांच्या कुलगुरूंना पत्रातून दिल्या आहेत.

### स्वच्छ भारत योजनेच्या सोबतीने...

देशात राबविण्यात येणाऱ्या स्वच्छ भारत योजनेच्या अंतर्गत जे विविध उपक्रम राबविले जातात, त्यांच्याच सोबतीने प्लास्टिकबंदीसुद्धा राबविली गेल्यास त्याचा अधिक परिणामकारकपणे उपयोग होऊ शकेल, असेही 'यूजीसी'ने विद्यापीठांना पाठविलेल्या सुचनांतून सुचविले आहे. त्याअंतर्गत प्लास्टिकनिर्मूलन आणि पर्यावरण सुरक्षा याबाबत जनजागृती घडविणारे नवनवे सामाजिक उपक्रम राबवावेत, असेही म्हटले आहे. विद्यार्थ्यांनी प्लास्टिकसाठी 'रिफ्युज (वापरास नकार), रिड्यूस (कमी वापर) आणि रीयूज (पुनर्वापर)' ही त्रिसूत्री अंगीकारावी, असेही सुचविण्यात आले आहे.



21 MAY 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘यिन’मुळे सामाजिक आरोग्य सुदृढ

## डॉ. डी. टी. शिर्के; सळसळत्या उत्साहात ‘समर यूथ समिट’ला प्रारंभ

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (यिन)च्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध उपक्रमांमुळे सामाजिक आरोग्य हळूहळू सुदृढ होऊ लागले आहे. एकूणच सकस समाजनिर्मितीसाठी या गोष्टी महत्त्वाच्या असल्याचे गौरवोद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले. डिलिव्हरिंग चेंज फाउंडेशनच्या 'यिन' या युवा व्यासपीठाने आयोजित केलेल्या 'यिन समर यूथ समिट'च्या उद्‌घाटनावेळी ते बोलत होते.

दरम्यान, हॉटेल पॅव्हेलियनच्या मधुसूदन हॉलमध्ये परिषद सुरू असून, सलग तीन दिवस विविध विषयांवर मंथन होणार आहे.

पान २ वर »



कोल्हापूर : डिलिव्हरिंग चेंज फाऊंडेशनच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क-''यिन''च्या वतीने आयोजित यिन समर यूथ समिटचे उद्‌घाटन करताना शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. या वेळी डावीकडून 'सकाळ'चे उपसरव्यवस्थापक रवींद्र रायकर, सुनील पाटील, तौहिद मुजावर, सकाळ माध्यम समूहाचे संपादक संचालक श्रीराम पवार, चीफ मॅनेजर (कम्युनिटी नेटवर्क) तेजस गुजराथी. (बी.डी.चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

# ‘यिन’मुळे सामाजिक आरोग्य सुदृढ

» पान १ वरून

डॉ. शिर्के म्हणाले, ''मानव विकास निर्देशांकात १८८ देशांत भारताचा १३१ वा क्रमांक लागतो. या पार्श्वभूमीवर आता आरोग्याला अधिक प्राधान्य द्यावे लागणार आहे. गेल्या पाच-दहा वर्षांत मोबाईल आणि ऑटोमोबाईलची क्रांती झाली. मात्र, त्यातील तंत्रज्ञानामध्ये आपली भागीदारी किती आहे, याबाबत चिंतन होणे गरजेचे आहे.''

स्पेक्ट्रम ॲकॅडमीचे संचालक सुनील पाटील म्हणाले, ''तरुणाईचे सशक्त व्यासपीठ म्हणून 'यिन'चा आता गौरव होतो आहे. या माध्यमातून तरुणाई अनेक सकारात्मक गोष्टींसाठी पुढे सरसावली असून, भविष्यात त्याचे तितकेच चांगले परिणाम दिसतील.''

'सकाळ माध्यम समूहा'चे संपादक संचालक श्रीराम पवार यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, ''देशातील नव्या परिवर्तनाची चळवळ म्हणून 'यिन' व्यासपीठ ओळखले जाऊ लागले आहे. कारण या माध्यमातून दोन हजारहून अधिक यशोगाथा पुढे आल्या आहेत.''

कार्यक्रमात 'यिन'च्या वतीने भारती विद्यापीठ इंजिनिअरिंग कॉलेज, सायबर, न्यू कॉलेज, गोखले कॉलेज, महावीर कॉलेज, विजयसिंह यादव आर्ट अँड कॉमर्स कॉलेजचा गौरव झाला.

'सकाळ'चे उपसरव्यवस्थापक रवींद्र रायकर यांनी स्वागत केले. चीफ मॅनेजर (कम्युनिटी नेटवर्क) तेजस गुजराथी यांनी आभार मानले. अमृता कदम हिच्या गणेश वंदना नृत्याने कार्यक्रमाला प्रारंभ झाला. अमरजा हिने सूत्रसंचालन केले. दरम्यान, तरुण पिढीला शैक्षणिक, सामाजिक व व्यावसायिक विकासावर लक्ष केंद्रित करताना समाज व देशासाठी रचनात्मक काम उभे करण्यास प्रेरणा मिळावी, हा या परिषदेचा मुख्य हेतू आहे. स्पेक्ट्रम ॲकॅडमी या परिषदेसाठी मुख्य प्रायोजक आहेत. पॉवर्ड बाय हॅशटॅग क्लोदिंग असणाऱ्या या परिषदांसाठी पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ कंपनीज, सुहाना मसालेवाले, अभी ग्रुप ऑफ कंपनीज, जे. जे. मगदूम ट्रस्ट (जयसिंगपूर) हे सहप्रायोजक आहेत.

### 'यिन'चे सभासदत्व

**जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये अॅडमिशन घेतानाच विद्यार्थ्यांना 'यिन'चे सभासद करून घेणार आहे. कारण आम्ही शिक्षणातून मुलांच्या मेंदूला चालना देतो. 'यिन'मुळे त्यांच्यातील सामाजिक जाणिवा अधिक प्रगल्भ होतील, असे प्रा. तौहिद मुजावर यांनी सांगितले.**

21 MAY 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एज्युस्पायर ॲडमिशन एक्स्पोला दिमाखात प्रारंभ

## करिअर निवडीचे मार्गदर्शन एकाच ठिकाणी

SPECTRUM ACADEMY
MPSC | UPSC | Bank Recruitment
Presents
eduspire
Powered by
DPU

कोल्हापूर, ता. २० : भविष्यातल्या शिक्षणाच्या संधी, बदललेले अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती, करिअरच्या विविध संधी आणि तंत्रज्ञानाबाबतची माहिती विद्यार्थी आणि पालकांना आता एकाच छताखाली मिळत आहे. डिलिव्हरिंग चेंज फाऊंडेशनच्या 'यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क' (यिन) या युवा व्यासपीठाच्या 'एज्युस्पायर' या ॲडमिशन एक्स्पोचे आज दिमाखदार उद्‌घाटन झाले. हॉटेल पॅव्हेलियनच्या मधुसूदन हॉलमध्ये सलग तीन दिवस हे प्रदर्शन होईल.

राज्याच्या विविध भागांमधील नामांकित संस्थांचा सहभाग, त्याचबरोबर शिक्षण आणि करिअरसंबंधी मोफत मार्गदर्शन हे या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य आहे. स्पेक्ट्रम ॲकॅडमी मुख्य प्रायोजक आहे. पॉवर्ड बाय डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटी, पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट आणि नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ, सृजन कॉलेज ऑफ डिझाईन, पुणे, सिमॅसिस इंटरनॅशनल इंटरडिसिप्लिनरी लर्निंग सेंटर (एसआयआयएलसी) आणि सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस्, पुणे सहप्रायोजक आहेत. दरम्यान, संत गजानन महाराज शिक्षण समूह (महागाव) प्रदर्शनाचे स्थानिक मुख्य प्रायोजक तर जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (जयसिंगपूर), शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (यड्राव) सहप्रायोजक आहेत.



कोल्हापूर : एज्युस्पायर ॲडमिशन एक्स्पोमधील रोबोटिक्सचे डेमो लक्षवेधी ठरत आहेत. डेमोचा अनुभव घेताना शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिंदे. शेजारी सकाळ माध्यम समूहाचे संपादक संचालक श्रीराम पवार, स्पेक्ट्रम ॲकॅडमीचे सुनील पाटील, जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्रा. तौहिद मुजावर, 'सकाळ'चे उपसरव्यवस्थापक रवींद्र रायकर. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

### विनामूल्य प्रवेश

एक्स्पोच्या निमित्ताने उभारण्यात येणाऱ्या एक्स्पिरियन्स झोनमध्ये बदलत्या तंत्रज्ञानाचा मागोवा घेता येत आहे. रोबो, नॅनो ड्रोन, व्हर्च्युअल रिॲलिटी, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, आयआरव्हीआर आदी तंत्रांचा अनुभव मिळत आहे. यासाठी इंडिया फर्स्ट रोबोटिक्स, डिजिटल आर्ट व्हीआरई, माईंड मॅटर्स, खुशी ॲडव्हर्टायझिंग यांचे सहकार्य लाभले आहे. प्रदर्शनासह रोबोटिक्सची प्रात्यक्षिके पाहण्यासाठी सर्वांना विनामूल्य प्रवेश असून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन 'यिन' परिवाराने केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 MAY 2018
Times of India

# Over 23,000 aspirants attended SUK's job fair

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Around 23,000 job aspirants attended the job fair organised by the Shivaji University, Kolhapur's (SUK) central placement cell, Centre for Skill and Entrepreneurship Development and Shivaji University Alumni Association on the varsity premises of on Saturday.

According to SUK officials, more than 122 companies with over 9,500 openings in sectors like IT, BPO, engineering, agriculture, banking, service sector, administration, hospitality and finance participated in the job and skill fair.

Rahul Gayakwad



A total of 23,000 job aspirants associated with the university participated in the job fair on Saturday

A total of 23,000 job aspirants associated with university participated in the job fair on Saturday. "The companies interviewed a total of 23,769 job aspirants for 9539 jobs. Some companies also conducted online tests for the aspirants. More than 10,000 candidates had applied through online and of-line system to participate in the job fair till May 18. We had also set up 50 registration centres on the campus for on the spot entry and grabbing this opportunity total number of registrations and participants reached 23,769," an university official said.

"The placement cells were set up at various departments of the university which helped us manage the flow of job aspirants and conduct the process smoothly. We had also set up 30 different stalls of 50 different skills and more than 6,500 job aspirants took benefit of these stalls to acquire these skills. They were given the certificate of the skills that they acquired free of cost," he added.